मानवव्याविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधसारांश आराखडा

शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास

शोधसारांश

संशोधक

पठाण मुस्तफा जिलानी

एम. ए. अर्थशास्त्र

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डी. ए. पुपलवाड

यशवंत महाविद्यालय नांदेड

शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास

प्रस्तावना

भारत हा विविध धर्म, जाती, जमाती व अनेक भाषांचा देश आहे. समाजातील विविधता व सर्व जाती, जमातीचे सांस्कृतिक परंपरा कायम ठेवण्याकरिता सर्व नागरीकांना संरक्षण देणे तसेच सामाजिक, शैक्षणिक व अर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गाना मुळ प्रवाहात आणणे आवश्यक आहे. मुस्लिम समाजाच्या आणि एकूणच अल्पसंख्याकाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी केंद्रिय स्तरावर सच्चर समीती, कुंडु समीती, रंगनाथ मिश्रा आयोग स्थापन करण्यात आहे आहेत.

सन २०११ च्या जनगणनेनुसार देशाची एकूण लोकसंख्या १२१०८५४९७७ असून देशातील एकूण मुस्लिम लोकसंख्या १७.२२ कोटी आहे. तर महाराष्ट्- राज्याची एकूण लोकसंख्या ११२३७४३३३ असून महाराष्ट्र राज्यातील मुस्लिमांची एकूण लोकसंख्या १२९७११५१ आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येत त्यांचे प्रमाण २.६९ टक्के मुस्लिमांची संख्या आहे. महाराष्ट्रातील या दुसऱ्या सर्वात मोठया समूह घटकांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर अगोदर या समाजाचा सर्वांगीण शास्त्रीय अभ्यास व्हायला हवा.

महाराष्ट्राच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक विकासात मुस्लिमांनी समृध्द भर टाकली आहे. सन २००६ च्या सच्चर समितीच्या अहवालानुसार राज्यातील मुस्लिमांची सामाजिक आर्थिक व शैक्षणिक स्थिती स्पष्ट केलेली आहे. तसेच हा अहवाल राज्य प्रशासनाने खास दखल घ्यावी असेही सांगतो. मुस्लिम समाजातील सामाजिक, आर्थिक कौंटुबीक शैक्षणिक आरोग्य, व कल्याणकारी योजनांच्या दृष्टीने सदयस्थिती काय आहे याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्या विषयाचा अभ्यास करावा लागतो त्या विषयाच्या निवडीपासून ते अंतिम टप्यापर्यत संशोधकाला विविध प्रकियेतून जावे लागते त्यामुळे संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. या संदर्भात रईसी एसेग्लेटन आणि क्रुस सी स्टॅटस यांनी अप्रोच टू सोशल रिसर्च या पुस्तकात म्हटले आहे की सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक जिवणातील विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्याची प्रक्रीया होय अर्थात समाजाशी निगडीत समस्या सोडवण्याच्या संदर्भात सामाजिक संशोधन केले जाते.

संशोधन विषयाची निवड

भारतीय समाजव्यवस्थेत अनेक घटक असून त्यातील एक महत्वाचा घटक म्हणजे अल्पसंख्याक असलेला मुस्लिम समाज होय. विकासाच्या प्रकीयेत एखादया समाजाच्या समस्येकडे दूर्लक्ष करत येणार नाही. कारण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वच समाजाचा विकास घडवून आणणे अभिप्रेत असते. इतर समाज आणि मुस्लिम समाज आणि मुस्लिम समाज यांच्यातील दरी केवळ भौगोलिक नसून मुळात अर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्वरूपाची आहे.

लोकशाही राज्य हे लोकांचे राज्य असल्याने मुस्लिम व इतर समाजातील आर्थिक सामाजिक व शैक्षणिक दरी भरून काढणे गरजेचे आहे त्यामुळे शासकीय स्तरावरून अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाचा सर्वागीण विकास व्हावा यासाठी भारतीय राज्यघटनेतील घटनात्मक तरतुदीच्या माध्यमातून व पंचवार्षिक योजना व पाचव्या पंचवार्षीक योजनेतून मुस्लिम समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती विचारात घेउन केंद्र शासनाने अल्पसंख्याक मुस्लिम समाजाच्या विकासासाठी एकात्मिक क्षेत्र अभ्यास पध्दतीचा अवलंब करून विविध अल्पसंख्याक आर्थिक विकास योजना राबवित आहे. राज्यातील एकूण मुस्लिम लोकसंख्येच्या ७०.७ टक्के मुस्लिम असंघटीत क्षेत्रात कुशल व अर्धकुशल कामगार म्हणून काम करतात. ८ टक्के शेतकरी आहे. तर १७.६ टक्के शेतमजूर म्हणून काम करतात. तसेच ३.६ टक्के घरकाम उदयोगात आहेत. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत मुस्लिमांचे शेतीमधील उपक्रम व शेती लागवडीत प्रमाण अल्प आहे. तसेच घरघुती उदयोग व इतर उपक्रमात इतरांपेक्षा सहभाग जास्त आहे. ७० टक्के मुस्लिम लोकसंख्या महाराष्ट्राच्या शहरीभागात ज्या ठिकाणी शेतीबाहय उपक्रमाचे वर्चस्व आहे त्या ठिकाणी अस्तित्वात आहे.

२००१ च्या जनगणेनेनुसार छोटे कामगार जे काम शोधतात किंवा मिळेल ते काम करतात. त्यामध्ये ३९.९ टक्के कामगार मुस्लिम समाजातील प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहेत. बेरोजगारामध्ये २० ते २४ वयोगटातील तरूण जास्त असून राज्यात मुस्लिम तरूणात बेरोजगारीचा प्रश्न मोठा आहे. विविध समित्याच्या निष्कर्षानुसार मुस्लिमाच्या एकूण लोकसंख्येतील तब्बल ६० टक्के लोक दारीद्रय रेषेखाली राहतात. समाजातील साक्षरता दर ७८ टक्कयाहून अधीक असला तरी शैक्षणिक गळतीचे प्रमाण सर्वाधिक असल्यामुळे केवळ

२.२ टक्के विघ्यार्थीच पदवीपर्यतचे शिक्षण पुर्ण करतात. मुस्लिम समाजाच्या बदलत्या सामाजिक आणि अर्थिक वातावरणाच्या त्यांच्या संस्कृतीवर मोठा परीणाम झाला असला तरी नांदेड जिल्हयातील मुस्लिम समाज या बदलत्या वातावरणाला कसे सामोरे जाते. मुस्लिम समाज आपले आर्थिक सामाजिक शैक्षणिक व नैतिक प्रश्न कसे सोडवण्याचा प्रयत्न करतो. नांदेड जिल्हयातील शहरी भागातील मुस्लिम समाजाच्या या विविध प्रश्नांचा अभ्यास अभ्यास करण्यासाठी नांदेड जिहयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा आर्थिक व सामाजिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास हा विषय निवडण्यात आला आहे.

२ संशोधन विषयाचे महत्व

निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या लोकांच्या विकासाचे प्रश्न अत्यंत गंभीर आहेत त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेत समाजातील कोणत्याही घटकाच्या समस्येकडे दुर्लक्ष करून चालणार नाही कारण विकासाच्या प्रकियेत संपुर्ण समाजाच्या विकास घडवुन आणणे अभिप्रेत आहे त्यामुळे प्रगत समाजाच्या तुलनेत उपेक्षित व मागास मुस्लिम समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकास करून मुस्लिम समाजास मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध मुस्लिम योजना व उपाययोजना राबवल्या जातात परंतू या योजनाचा अल्पसंख्याक मुस्लिमांना कितपत फायदा होतो. आणि त्यामुळे सामाजिक व आर्थिक परिस्थिती किती प्रमाणात बदलते हे महत्वाचे आहे मुस्लिम समाजात दहा हजार पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्याची ३०.४ टक्के आहे तर २४ टक्के लोकांचे उत्पन्न आहे. एकूण समाजाच्या विचार करता मुस्लिम समाजातील २७.४ टक्के लोकसंख्या झोपडीत राहतात राज्याच्या विविध योजनामुळे इतर अल्पसंख्याक गटाचा विकास होत असताना मुस्लिम समाजाची स्थिती मात्र दयनीय आहे. त्यामुळे नांदेड जिल्हयात राबवणाऱ्या अर्थिक योजनांचा लाभ किती मिळाला व कोणाला मिळाला या दोन कारणांचा विश्लेषणात्मक अभ्यास महत्वाचा आहे तसेच मुस्लिम समाजातील कर्जबाजारीपणा, आजार, अज्ञान, निरक्षरता अशा विविध समस्यांना सामोरे जाताना त्यांच्या विकासातील आर्थिक व सामाजिक समस्याचे विश्लेशण महत्वाचे आहे.

इतर प्रगत समाजाच्या तुलनेत मुस्लिम समाजाचा विकास फारसा झालेला नाही जो काही थोडा फार आर्थिक सामाजिक विकास झाला आहे त्यातही जातीनिहाय असमतोल आहे त्यामुळे सर्व समाजाच्या सर्वांगीन विकासाच्या मार्गातील आडथळे दुर करण्यासाठी नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास हा विषय अनन्यसाधारण महत्वाचा आहे.

संशोधनाची उदीष्टे -

१ नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२ ग्रामीण व शहरी भागातील मुस्लिम समाजाच्या परिस्थीतीचा अभ्यास करणे.
३ मुस्लिम समाजासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
४ ग्रामीण व शहरी भागातील मुस्लिम समाजाच्या राहणीमानाचा अभ्यास करणे
५ मुस्लिम समाजाच्या व्यवसाय रचना स्वंयरोजगाराच्या स्थितीचे अध्ययन करणे.
६ मुस्लिम समाजातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनासाठी शिफारशी करणे.

गृहीतके

१ नांदेड जिल्हयातील मुस्लिम समाज सामाजिक व अर्थिक दृष्टया मागासलेपणा आढळतो.

२ मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे.

३ मुस्लिम समाजाला विविध शासकीय योजनांचा पुरेसा लाभ मिळालेला नाही.

४ ग्रामीण व शहरी भागातील मुस्लिम समाजाच्या राहणीमानात विषमता आढळते.

५ मुस्लिम समाजात दारिदय व बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे.

५ संशोधन पध्दती

नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा आर्थिक व सामाजिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास हा सध्याचा संशोधन विषय असून तो सामाजिक व आथिक असल्याने संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी सामाजिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून सर्वेक्षण व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून वस्तूस्थिती संकलणासाठी प्राथमिक साहीत्य व शैक्षणिक साहीत्याचा अवलंब करण्यात येणार आहे.

अ. **माहीती गोळा करण्याची पध्दती**

सामाजिक संशोधनात एकदा समस्या निश्चित झाली की त्याविषयी वस्तुस्थिती गोळा करावी लागते. त्यानंतर संकलीत केलेल्या वस्तुस्थितीचे वर्गीकरण संकलन करून समस्या सोडवली जाते. माहीती गोळा करण्याच्या दोन पध्दती आहेत यात प्राथमीक माहीती आणि दुयम माहीती आहे.

१ प्राथमिक माहीती

संशोधकाला पहिल्या प्रयत्नातून मिळालेल्या वस्तुस्थितीला प्राथमिक साहीत्य किंवा साधने असे म्हणतात. संध्याच्या संशोधनात कार्यासाठी अचूक माहीती गोळा करण्याचे साधन म्हणून अनुसुचीचा वापर केला जातो.

संशोधनासाठी प्राथमिक माहीती ही प्रत्यक्ष नांदेड जिल्हयातील मुस्लिम व्यक्तीच्या अनुसुचीच्या साहायाने मुलाखती निरीक्षण इत्यादी दवारे गोळा करण्यात येईल मुलाखतीमध्ये विविध शासकीय योजनांच्या मुस्लिम उदयोजक व्यवसायीक स्वंयरोजगारी युवक इतयादीच्या मुलाखती घेण्यात येतील.

२ दुयम माहीती

सदरील संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी आणि अधिक माहीती मिळवण्यासाठी वैज्ञानिक साहीत्याचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध पुस्तके शोधनिबंध अभीलेखीय अहवाल हस्तलिखीत पत्रे नियतकालीके संशोधन नियतकालीकामध्ये प्रसिध्द होणारे लेख शासकीय वार्षिक अहवाल संकेतस्थळे मुस्लिम विभागाची विविध पुस्तके व अहवाल विविध स्वंयसेवी संस्थेचे कार्यअहवाल साप्ताहीके वृतपत्रे आदीचा वापर करण्यात येणार आहे.

ब नमुना निवड

सदरील विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक आधार म्हणून गुणात्मक मुलाखत तंत्र पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. सन २०२२ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्हयातील एकूण लोकसंख्या ३३६१२९२ असुन त्यापैकी ४७१९५१ मुस्लिम लोकसंख्या असून ती एकून लोकसंख्येच्या १४.०४ टक्के एवढी आहे. सतेच नांदेड जिल्हयात एकूण १६ तालूके असून त्यापैकी कंधार ३१.८४ टक्के, मुखेड १९.७१ टक्के, मुखेड १९.७१ टक्के, लोहा ११.२६ टक्के, देगलूर २८.८६ टक्के, नांदेड वाघाळा ३३.५९ टक्के, आणि सर्वाधीक मुस्लिम लोकसंख्या वाजेगाव ६७. २२ टक्के एवढी आहे

तरीही वरील प्रत्येकी ७ तालूक्यातील प्रत्येक तालूक्यातून तीन तालूके व प्रत्येक तालूक्यातून तीन गावांची निवड करून प्रत्येक गावातून बहूसंख्य मुस्लिम संख्या असणाऱ्या गावातील २५ कुटुंबाची निवड करून एकून १५० कुटुंबाच्या मुलाखती घेउन संशोधन अहवाल पुर्ण करण्यात येणार आहे.

१ वस्तुस्थितीचे विश्लेषण

माहीती संकलनानंतर माहीतीचे विश्लेशण करण्यासाठी काही प्रमुख सांखीकीय तंत्राचा वापर केला जातो. यामध्ये सरासरी, प्रमाण, वृतालेख शेकडेवारी इत्यादीचा वापर करण्यात आला.

२ आकडेवाडीचे विश्लेषण

सदरील संशोधन विषयासंबधी मिळालेल्या माहीतीचे विश्लेषण करण्यासाठी सांखीकीय साधनांचा वापर करण्यात येणार असून त्यात एकून सरासरी या साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

३ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -

नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा अर्थीक व सामाजिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास या विषयावरील संशोधनाची व्याप्ती नांदेड जिल्हयाची आहे.

सदरील संशोधाचा विषय हा शहरी व ग्रामीण भागातील समाजाचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास आहे. या संशोधनात फक्त नांदेड जिल्हयातील मुस्लिम समाजाचा अभ्यास करण्यात येणर आहे. तसेच सन २०११ ते २०२० या दहा वर्षातील माहीती गोळा करण्यात येणार आहे.

४ अध्यायाची रूपरेषा

नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा आर्थीक व सामाजिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास हा सदरील संशोधन विषय सहा अध्यायात विभागण्यात आला आहे त्या संशोधन विषयाचा अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणाचा सारांश पुढील प्रमाणे दिला आहे.

अध्याय १

प्रस्तावना

या प्रकरणात मुस्लिम संदर्भाचा सारांश आणि विश्लेषण करण्यात आले आहे. यात सर्वात प्रथम मुस्लिम संकल्पनेविषयी विषयी तज्ञ व अभ्यासकाच्या मतांचे विश्लेशण करून त्याचे आर्थिक प्रश्न व सामाजिक प्रश्न या संकलपनाचा अर्थ समजावून सांगीतला आहे. मुस्लिम समाजातील विविध समस्या राहणीमान, परंपरा, सण, इत्यादी समाजातील विविध विधी भारतातील मुस्लिमाची भौगोलिक विभागणी महाराष्ट तील मस्लिम विभाग आदींची संक्षिप्त स्वरूपात मांडणी करण्यात आली आहे.

अध्याय २

नांदेड जिल्हयातील भौगोलिक पार्श्वभुमी

सदरील अध्यायात नांदेड जिल्हयाच्या प्राचिन इतिहासाचे थोडक्यात विश्लेषण करून नांदेड जिल्हयातील भौगौलिक स्थान, विस्तार, सिमा, क्षेत्रफळ हवामान मातीची रचना शेतजमीन क्षेत्र शैक्षणिक आकर्षणे क्रिडा वपर्यटने स्थळे इत्यादीचे विश्लेषण संक्षिप्त स्वरूपात करण्यात आला आहे,

अध्याय ३

संशोधन पध्दती व पुर्व संशोधन साहीत्याचा आढावा

सदरील अध्यायात संशोधन विषयानुसार केवळ परीचय करण्यात आला आहे. तसेच संशोधन विषयाच्या निवडीच्या अनुषंगाने संशोधन विषयाचे महत्व विश्लेषित करण्यात आले आहे. संशोधन विषयानुसार संशोधन विषयाची उदीष्टे परिकल्पना ग्रहीतके किंवा संशोधन समस्येशी संबधीत माहीती संकलीत करण्यासाठी संशोधन पध्दतीची व्यवस्था करण्यात

आलेली आहे. प्राथमिक माहीती संकलित करण्यासाठी संशोधनासाठी संशोधन पध्दतीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्राथमिक माहिती सामग्री मुलाखत तंत्र वापरताना नमुना पध्दत वापरली जाते

नांदेड जिल्हयातील ७ तालुक्यातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील २० कुटुबांची निवड करून १४० कुटुबांच्या मुलाखती घेउन नमुना पध्दतीने माहीती संकलित करण्यात येणार आहे. तसेच वस्तुस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी अवश्यकतेनूसार सांख्यिकी तंत्राचा वापर करून ग्रहीतकाची पडताळणी करण्यासाठी अवश्यकतेनुसार सांखीकी तंत्राचा वापर करून गृहीतकाची पडताळणी करण्यासाठी सरासरी चाचणीचा अवलंब करणार आहेत. संशोधन विषयानुसार या आधीच्या संशोधनाचा आढावा घेउन संशोधन विषयाची दिशा ठरविण्यात येणार आहे.

अध्याय ४

नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा

नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा आर्थिक व सामाजिक विकासाचा इतिहास विविध तज्ञानी व विविध सरकारी दस्ताऐजाचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. नांदेड जिल्हयातील मुस्लिम समाजाचे राहण्याचे ठिकाण, वस्त्या, घरबांधणी, घरगुती साहीत्य, भाषा , पेहराव, कौटुंबिक जीवन, लोकाचे स्वरूप व शरीररचना सांस्कृतिक स्थितीविश्लेषण , जन्मविधी, मृत्युनंतरचेविधी, परंपरा, सण उत्सव इत्यादीचा समावेश आहे, तसेच शेती, शेतमजूर पशुसवर्धन बांधकाम, मासेमारी, इतर व्यवसाय, शैक्षणिक स्थिती साक्षरता लोकसंख्या, मुस्लिम समाजासाठी विविध योजना व गावठी कर्ज इत्यादी योजनेच्या संदर्भात संशोधन विश्लेषण करण्यात येणार आहे.

अध्याय ५

नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाचा सामाजिक व आर्थिक विकास माहिती संकल्पनाचा तुलनात्मक अभ्यास

सदयस्थितीत सुरूवातीला अल्पसंख्याक मुस्लिम समाजाच्या आर्थिक स्थितीची माहीती संकलीत करून विश्लेषीत करण्यात येणार आहे. त्यामध्ये मुख्य व्यवसाय शेती, शेतीला पुरक व्यवसाय व त्याचे स्वरूप इतर व्यवसाय सरकारी नौकरी व त्याचे स्वरूप शिक्षण शाळा व मुलांची उपस्थिती तसेच शासनाच्या विविध योजना इत्यादीचा अभ्यास सदरील अध्यनात करण्यात येणार आहे.

तसेच आर्थिक विकासाची तुलना सामाजिक विकाससोबत करताना समाजातील विविध प्रथा, राहणीमाण, विवाह प्रथा, घरांचे प्रकार, कुटुंब व्यवस्था, धार्मिक विधी, समाजातील व्यसने समाजतील लोकांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर व त्यांच्या कामाचे स्वरूप इत्यादी तुलनात्मक अभ्यास.

अध्याय ६

सारांश निष्कर्ष व शिफारशी

सदरील संशोधनात नांदेड जिल्हयातील मुस्लिम समाजाच्या विविध साधनांच्या साहायाने माहीती गोळा करून यात मागील पाच प्रकरणाचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचा संपुर्ण अभ्यास करून योग्य ते निष्कर्ष काढून त्यामधील विविध समस्यावर योग्य ते उपाय व शिफारशी करण्यात येणार आहे.

संदर्भसुची

पुस्तके

१ सच्चर समीती अहवाल २००६ भारतातील मुस्लिम समुदायाचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक परिस्थतीचा आढावा.

२ डॉ. आबेद खान मुस्लिम समाज सामाजिक व आर्थिक संदर्भ

३ महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विभाग अहवाल.

४ Basant R.(2007), “Social, Economic and Educational Condition of India Muslims” Economi and Political Weekly, Vol.42(10): 829-832

5 Kulkarni P.M. (2010), “The Muslim Population of India: A demographic Portrayal Handbook of Muslims in India: 283 Empirical and Perspectives/Ed. By Rakesh Basant, Abusaleh Sharif, Oxxford University Press, New Delhi. PP 92-112.

6 Sing D.P. (2011),”Demographic, Socio Economic and Educational Status of the Muslim Community in Maharashtra.” Maharashtra State Minority Commission Government of Maharashtra.

वेब संसाधने

१ Http://nanded.gov.in

2 Http://mdd.maharashtra.gov.in

3 Http://marathwada.gov.in

4 Http://www.Minorityaffairs.gov.in

5 http://en.wikipedia.org

संशोधक

पठाण मुस्तफा जिलानी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर आनंदराव पपुलवाड

यशवंत महाविद्यालय नांदेड